## नियमित दिवाणी दावा क्र. १४४/२०१९ मधील नि.क्र. ६२ वरील आदेश

(CNR NO MHRG14000142019)

१. सदरचा अर्ज वादीने त्यास मयत प्रतिवादी क्र. ३. द्वारकाबाई पांडुरंग ठाकूर यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेस झालेला विलंब माफ करणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी नि.क्र. ७२ वर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीचा दावा अबेट होवून १ वर्ष ७ महिन्यांचा कालावधी निघून गेलेला आहे. सदर विलंब माफ न करण्याजोगा असून सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांना प्रतिवादी क्र. ३ यांच्या मृत्युच्या दाखल्याची कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने तसेच वादी यांच्या कायद्याच्या अज्ञानपणामुळे व कोरोना प्रादुर्भावामुळे मुदतीत अर्ज दाखल करता आला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना दाव्यात हजर होवून त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करुन त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज रद्द करणे योग्य व संयुक्तिक आहे. परंतु वादीने सदरचा अर्ज हा विलंबाने दाखल केल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता वादीस खर्च लावून अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | वादीचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना दयावी. |
| ३ | सदर खर्चाची रक्कम वादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत प्रतिवादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण

दिनांक – ०५.०७.२०२३

(निलेश म. वाली)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १४४/२०१९ मधील नि.क्र. ६४ वरील आदेश</u>**

(CNR NO MHRG14000142019)

१. सदरचा अर्ज वादींनी त्यांस मयत प्रतिवादी क्र. ३. द्वारकाबाई पांडुरंग ठाकूर यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेस झालेला विलंब माफ करणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी नि.क्र. ७२ वर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीचा दावा अबेट होवून १ वर्ष ७ महिन्यांचा कालावधी निघून गेलेला आहे. सदर विलंब माफ न करण्याजोगा असून सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ३. द्वारकाबाई पांडुरंग ठाकूर या दिनांक १६.०८.२०२१ रोजी मयत झाले असून त्यांचे वारसांना मुदतीत अभिलेखावर घेतले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश पारीत करणेत आला आहे. परंतु वादी यांना प्रतिवादी क्र. ३ यांच्या मृत्युच्या दाखल्याची कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने तसेच वादी यांच्या कायद्याच्या अज्ञानपणामुळे व कोरोना प्रादुर्भावामुळे मुदतीत अर्ज दाखल करता आला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश पारीत झाला आहे. मयत प्रतिवादी क्र. ३ यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक होईल. परंतु सदर वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना मुदतीत अभिलेखावर घेतले नसल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता वादींस खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | वादींचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना दयावी. |
| ३ | सदर खर्चाची रक्कम वादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत प्रतिवादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण

दिनांक – ०५.०७.२०२३

(निलेश म. वाली)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.

## नियमित दिवाणी दावा क्र. १४४/२०१९ मधील नि.क्र. ६६ वरील आदेश

(CNR NO MHRG14000142019)

१. सदरचा अर्ज वादीने त्यास मयत प्रतिवादी क्र. ३. द्वारकाबाई पांडुरंग ठाकूर यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी नि.क्र. ७३ वर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनासदर वारस रेकॉर्डवर घेणेकरीता माफ करता न येण्यासारखा विलंब झालेला आहे. तरी वादीचा सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील ३. द्वारकाबाई पांडुरंग ठाकूर या दि. १६.०८.२०२१ रोजी मयत झाले असून त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. परंतु वादी यांना प्रतिवादी क्र. ३ यांच्या मृत्युच्या दाखल्याची कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने तसेच वादी यांच्या कायद्याच्या अज्ञानपणामुळे व कोरोना प्रादुर्भावामुळे मुदतीत अर्ज दाखल करता आला नाही. मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना दाव्यात हजर होवून त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक होईल. परंतु वादींनी सदरचा अर्ज हा विलंबाने दाखल केल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता वादींस खर्च लावून अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | वादी यांचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना दयावी. |
| ३ | सदर खर्चाची रक्कम वादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत प्रतिवादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – ०५.०७.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.

## <u>नियमित दिवाणी दावा क्र. १४४/२०१९ मधील नि.क्र. ६८ वरील आदेश</u>

(CNR NO MHRG14000142019)

१. सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ३. द्वारकाबाई पांडुरंग ठाकूर यांचे वारसांना दाव्यात सामील करण्याकरीता तसेच दाव्यातील सरनाम्यात प्रतिवादीपुढे 'मयत' असे अक्षर लिहून प्रतिवादींच्या वारसांची नावे लिहण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी नि.क्र. ७४ वर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनासदर वारस रेकॉर्डवर घेणेकरीता माफ करता न येण्यासारखा विलंब झालेला आहे. तरी वादीचा सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ३. द्वारकाबाई पांडुरंग ठाकूर या दि. १६.०८.२०२१ रोजी मयत झाले असून त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. मयत प्रतिवादी क्र. ३ यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस आहेत. सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता, जाहिर ठरावाकरीता व निरंतर ताकदीच्या मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ यांचे अर्जात नमूद वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज हा विलंबाने दाखल केल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता वादी यांना खर्च लावून अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

### <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | वादी यांनी सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना पुढील तारखेचे आत द्यावी. |
| ३. | वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर विहीत कालावधीत दाव्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |
| ५. | सदर खर्चाची रक्कम वादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत प्रतिवादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण

दिनांक – ०५.०७.२०२३

(निलेश म. वाली)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.